म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 9639




REFBK-0014810
REFBK-0014810

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........

# कूजितें आणि गर्जितें

REFBK-0014810
REFBK-0014810

शिरीष

१४८७०

सव्वा रुपया

वि त र क :

गोकुळ मासिक प्रकाशन, पुणें २.

प्रथमावृत्ति :
शके १८८७; सन १९६५

□ □

मूल्य रु. १=२५

□ □

© १९६५
सौ. जयश्री आगाशे
एम्. ए., बी. टी.
'स्वप्नरेखा,' बाजीराव पेशवे मार्ग
मराठीनगर, अकोला (महाराष्ट्र)

□ □

प्रकाशक :
सौ. जयश्री आगाशे
एम्. ए., बी. टी.,
'स्वप्नरेखा,' बाजीराव पेशवे मार्ग
मराठीनगर, अकोला

□ □

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणे २

हिंदवी राष्ट्रवादाचे जनक

**छत्रपति शिवाजी महाराज ;**

माझ्या मनात मराठी मातीची लेणी कोरणारे

**कै. नाथमाधव**

आणि माझी तीर्थरूप मातोश्री

**कै. वेणुताई**

यांच्या पवित्र स्मृतीस

कृतज्ञतापूर्वक. अर्पण

**—शिरीष**

## *कूजिते आणि गर्जिते*

या कविता नाहीत; हे साहित्य नाही. राष्ट्रवादी मराठी मनाचे हे उद्रेक आहेत ही हृद्‌गते जशी स्फुरली तशी कागदावर उतरवली. ती प्रथम कूजिते होती त्याना दाबता आले नाही तेव्हा ती गर्जिते झाली. ही हृद्‌गते एका माणसाची नाहीत; ही एका श्रद्धेची आहेत आणि म्हणून तेवढ्याच मर्यादित अर्थाने ती अपौरुषेय आहेत. ती वाचली गेली तर जे साधेल त्यापेक्षा ती ऐकली गेली तर अधिक साधेल. त्यावर विधायक विचार झाला तर त्याहूनहि अधिक साधेल नि त्यांच्यातील राष्ट्रीय स्वातंत्र्य नि समाजवादी श्रद्धा यासाठी आवश्यक असलेले रक्त, घाम आणि अश्रू यांचे खतपाणी निर्धाराने त्याना मिळाले तर इष्टसिद्धी झाली असे म्हणता येईल. काळ आणि भरती-ओहोटी कुणासाठी थांबत नाहीत. जितक्या लवकर हा उमज समाजजीवनात उतरेल तितक्या लवकर समाजाने काळाचे आव्हान स्वीकारले असे होईल.

मध्ययुगीन शिलेदारीने भारलेली देशप्रेमी हृदये एका ओहोळातून सक्रिय प्रयत्न करीत वाहू लागली तर या हृद्गतासाठी फकीर होण्यातहि स्वर्गसुख लाभेल.

अन्यथा विचारविलासातून विकार निर्माण होईल आणि असहायता आणि वैफल्य एवढीच काय ती समाजजीवनात शिल्लक राहतील.

जे मनात मावले नाही ते सांडले अशी ही ‘ कूजिते अन् गर्जिते ! ’

महाराष्ट्र - दिन : १९६५<br>
स्वप्नरेखा, मराठीनगर, अकोला

शिरीष

# अनुक्रम


भरकटलेले वेडगाणे
कूजिते अन् गर्जिते : शिरीष
अर्पणपत्रिका
स्वातंत्र्याने जगू
आव्हान
घडवूं राष्ट्र महान
पुढे पुढे चाललो
महाराष्ट्राच्या सह्यगिरी !
मी महाराष्ट्र म्हणतो तेव्हा
अस्मिता
स्वगत
नीतिसूत्रे
मूठभर
असा मराठा मेळवावा
अश्रू
स्वातंत्र्य
कर्तव्य
वञ्चना
परंपरेची मशाल
आमचे ब्रीद
निर्वासित
धिक्कार असला अस्तित्ववाद
आशेला जागा आहे
परंपरेचा धागा
शब्दार्थ
झगडा
लुमुम्बा
गिझेंगाच्या बराकीतून
सामर्थ्य
पोट आणि पाठ
इच्छाशक्ति
रायगडाला जाग येते
समर्थ
मरण
सुभाषितें
शिवनेरीवर
निर्धार
अर्घ्य
जय महाराष्ट्र
बोधवाक्य

# भरकटलेले वेडगाणे

पुन्हा एकदा इतिहासाचे सिंहावलोकन. भारताचा इतिहास अनेक युगांचा असेल. पांच हजार वर्षांचा सांगतात, दीड दोन हजार वर्षांचा चांगला ठाऊक आहे, तीन चार शतकांचा तर पाठ आहे, दीड शतकाचा अगदी ताजा आहे आणि दीड तपाचा अगदीं डोळ्यांसमोर घडला आहे! मानवताधर्म, उंच परंपरा, शांतीची आस, सहजीवनाचा ध्यास धमनीतून रक्ताबरोबर वाहत आहेत. अंतर्गत फूट, परचक्रांच्या मालिका माहीत आहेत. समान संकट आले की एकत्र उभा राहणारा भारत किती लवकर एकतेतून अनेकत्वात विरतो! तेच जीवन जगून झाले आहे. थोर परंपरेची पार्श्वभूमी असूनहि हृदयांत कुठे तरी खोल खंत आहे. शब्दांत उतरवावी वाटली तरी उतरत नाही; अप्रिय आहे, कटू आहे!

तीन वर्षांत दोनदा आणीबाणी! दोन दिवाळ्या, ज्योती काय म्हणाल्या? राष्ट्रसीमेवर सैनिक ठाम उभे ठाकले, शौर्याने लढले, धारातीर्थी पडले. अजून ते तेथेच उभे आहेत. आम्ही हिमालयावर लढलो; अजून लढत आहोत. थंडी आहे, बर्फ आहे; उबदार कांबळ्या आहेत; पण कुठे? एका कांबळीच्या दोन होऊन त्यांतली एक हिमालयाच्या थंडींत पोहचली का? शत्रूचे सैन्य लाटांनी आले क्षितिजापलीकडून तेव्हा क्षितिजाअलीकडेहि लाटा होत्या; पण कुठे? पोटावर सैन्य चालतें, त्या पोटांच्या पाठीशी आम्ही होतों; स्वकर्तव्यरत, थोर उद्दिष्टांनी भारलेले! कुठे? आकाशांत आतषबाजी झाली. सेबरवर नॅटने मात केली, आम्ही रोमांचित झालो. गोळ्या छातींत घुसल्या, पण पाठींत नाहीं. आमचे सैन्य पुढे पुढे गेले पण त्यांनी तोफांकडे पाठ वळवली नाही!

आणि आम्ही अभिमानाने रुद्धकंठ झालो! केवढे निश्चयाचे निर्धाराचे वातावरण! इतिहासांतील ' त्या ' खंतीचा काटा आता मोडणार? आम्ही खडबडून उठलों. सटवीचा ललाटलेख पुसणार? आम्ही दाटलें होतों. टाळू-वरचे लोणी खाण्याइतके आम्ही पापी नाही! नवा आविष्कार फुलत होता. त्याग, उद्देश, ध्येय, श्रेयस् यांनी भारताचें जीवन उजळून आलें...

शस्त्रसंधी, अग्निबंदी....दिवाळी आली. त्यांचे स्मरण, त्यासाठी त्याग, वैराग्याची दिवाळी, जे आम्ही आनंदासाठी खर्च करणार असूं त्या साऱ्याची सीमेवर रवानगी, हेच विचार आमच्या मनांत होते.

प्रचंड स्वातंत्र्यकक्षा असलेले प्रबळ राष्ट्र उभे राहिले पाहिजे. दुर्जनाच्या निर्दालनाने सुजनांचे जीवन विकासशील राहिले पाहिजे. व्रतनिष्ठ राष्ट्रीयता अबाधित विकसत गेली पाहिजे. आधी राष्ट्र व नंतर आम्ही...आमचे जीवन नंतरच्या पिढ्यांच्या जीवनांच्या हमीसाठी. या जाणिवा जागत राहिल्या पाहिजेत.

अब्दाली, पानिपत, छत्रसाल, कर्झनचा वंगभंग, अठराशेसत्तावन, भारताची फाळणी यांच्या जाणिवा जेथे जागल्या; यांच्या खंती जेथे रुतल्या; ...भारतीय स्वातंत्र्याचा आत्मा जेथे शतकानुशतके जोपासला तो टिकवायचा! तो स्फुल्लिंग धुमसत ठेवायचा! ईप्सितासाठी हाल सोसणारे मिळावेत म्हणून, भोगासाठी त्याग करणारे सापडावेत म्हणून!

इंग्लंडचे स्वातंत्र्य एल्ब नदीच्या किनाऱ्यावर जपायचें। हिमालयाच्या हिमल सीमा, कच्छ ते कारगिल, लडाख ते नागभूमी या सीमांवर भारतीय स्वातंत्र्याच्या स्फुल्लिंग-रक्षणाचा लढा द्यायचा, तोच स्वातंत्र्याचा आत्मा जपण्यासाठी.

ही कोती वृत्ती नव्हे, राष्ट्रवादी व्यवहारदृष्टी! स्पार्टाची भूमी अबाधितच राहिली पाहिजे, वामनाला पाऊलभर पुण्यभूमी मिळालीच पाहिजे, राष्ट्रीयता

धर्मवेडासारखी जतन केली पाहिजे, स्वातंत्र्य असंख्य देहांच्या कुरवंडीखाली जपले पाहिजे, वाढू दिले पाहिजे.

म्हणून हा खटाटोप. वेडगाणे गाण्याचा सर्वनाश न येवो, पण आलाच तर टिकून राहण्याचा. सूक्ष्मदेहांतून विशाल देहांत पुन्हा प्रस्फुरित होण्याचा. दगडांनी चेचल्यानंतरहि जीवनाच्या बळकट मज्जांनी पुन्हा जगत राहण्याचा. हा खटाटोप वेडगाण्यांतून समजला तर ते वाङ्मय आणि नच समजला तर केवळ बाराखडीची कसरत !

समरांगणिं जे उभे ठाकले
लढले, पडले धारातीर्थी
हौतात्म्याच्या अन् शौर्याच्या
असंख्य उजळुनि गेल्या ज्योती
आजहि सीमेवरी उभे जे
संगिन रोखुनि खडा पहारा
स्वातंत्र्याचें शिल्प राखण्या;
असह्य थंडी, हिम अन् वारा !
त्या साऱ्यांचे स्मरण अंतरीं
वैराग्याची जगूं दिवाळी
स्नेहांतुनि उजळून दीपिका
अमंगलाची जाळू होळी !

या जाणिवेने आम्ही दिवाळी जगणार का ? ती तशी जिथे जगली जाईल तेथे राष्ट्रीयत्वाचे कोंब अबाधित राहतील ! . .

* * *

# स्वातंत्र्याने जगू

स्वातंत्र्याने जगू वीर हो स्वातंत्र्याने जगू
तन्मयतेने जमीन कसुनी सस्यशामला बघू
महाराष्ट्र वायुवरी अन्नधान्य मौक्तिके
निश्चिती मनी जरी कनकरत्न ही पिके
स्वाभिमान राखुनी राष्ट्रजीवनी जगू
वैभवात कीर्तितेज महाराष्ट्र हा बघू
सिंधु सागरावरी आरमार डोलते
सह्य विंध्य अंबरी वायुयान विलसते
मुक्त जीवनात गीत तटिनी जल घुमविते
जय स्वदेश महाराष्ट्र जय मराठि बोलते
उंच अंबरी बघू स्वतंत्रता पुरी जगू
स्वतंत्र आम्ही क्रांतिवीर स्वातंत्र्याने जगू
महाराष्ट्र, वंग, आंध्र, उत्कल, पंजाब देश
शक्तिशालि उन्नत स्वातंत्र्य भारती बघू

**मुंबई, ऑक्टोबर १९५०**

आव्हान !....आव्हान ! !...आव्हान ! ! !
मर्दमनांनो, बलरामांनो
स्वीकारा आव्हान
उचला नवे ' विड्याचे पान ' !

भारतभूच्या उत्तर सीमा
काराकोरम–हिमालय–हिमा
परचक्राचे संकट तुडवी;
आज हिमल–अस्मान....
बांधुनि कंबर, तोलुनि अंबर
खेचा मत्त गुमान
उचला नवे यशाचे पान !

सिंधु, जेहलम् पंचनदांचे
गंगा, यमुना, सरस्वतीचे
केले आम्ही युगे युगे जे
मंगल अमृतपान
त्या पुण्याच्या कृतज्ञतेचे
जागे आज इमान
उचला पवित्र तीक्ष्ण कृपाण !

अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ....9639.... नोंद दि: 29|5|6

मानदंड हा उभा हिमालय
देवऋषींचे पावन आलय
किरात–किन्नर–गंधर्वांची
उठते जेथे तान
हिमालयाची उंच मान अन्
तिचा भव्य सन्मान
राखा अर्पुनि अपुले प्राण

निश्चय अमुचा, बलशाली मन
परंपरेचे वैभवमय धन
शिवरायाच्या भवानिची अन्
घेउनि पावन ‘आण’
विजय पावु वा हिमात लोपू
कंकण हे, हे वाण
अमुचे राष्ट्रासाठी प्राण
अमुच्या हाती राष्ट्र-निशाण !
स्वातंत्र्याचे मोल अम्हांला
परचक्राचा परतवु घाला
अमुच्या प्राणपणातुनि उमले
पिढ्यापिढ्यांचा मान !

इतिहासाच्या ऐरणीवरी
घडवू हा अभिमान
रुधिराने अन् लिहूनि जाऊ
नव वेदांचे पान
झेलू छातीवर आव्हान !

आव्हान !...आव्हान !!...आव्हान !!!
भारतभूच्या नव–युवकांनो
स्वीकारा आव्हान
उघडा नवे यशाचे पान !
उचला नवे विड्याचे पान !!

वास्तवतेच्या प्रकाशातले
स्वीकारुनि आव्हान
रुधिर स्वेद या रसायनातुनि
घडवू राष्ट्र महान

नसे कुणाची मिरासदारी
नसे राव अन् कुणी भिकारी
समानतेची सत्य तुतारी
घुमेल भरुनि वितान

श्रम मोलाचे नाणे खण्खण
कर्तव्याचे हाती कंकण
अधिकारांचे अम्हांस शिक्षण
राष्ट्रप्रेम अभिमान

नसे वञ्चना बंधुत्वाची
विटंबना नच समानतेची
घोषणा खरी स्वातंत्र्याची
दुमदुमेल अस्मान

अराष्ट्रतेच्या नावाखाली
नको अम्हांला परकी–शोषण

‘ मित्र–भाइ ’ या शब्दी लपले
नको अम्हांला जळवा पोषण
राष्ट्रीयतेतुनि मानवतेचे
घडेल आम्हा विराट दर्शन

नव्या जगाच्या नव्या जीवनी
अश्रूंना नच स्थान
रुधिर-स्वेद या रसायनातुनि
घडवू राष्ट्र महान

## पुढे पुढे चाललो

पुढे पुढे चाललो भारतीय एकसाथ
' स्वतंत्रता अमर असो, ' सज्ज आमुचेहि हात
सिंधु सिंधु—वंगसिंधु भारत एक राष्ट्र हे
सेतु ते हिमालयगिरि भारत एक राष्ट्र हे
भारतीय एक राष्ट्र मनोमनी हि खूणगाठ
पुढे पुढे चाललो भारतीय एकसाथ !

याद ही अम्हा पुरी गांधारहि आमुचा
विस्मरू कसे आम्ही द्रुपद देश आमुचा
मगध राष्ट्र गुंजते, " भारतीय विश्वनाथ ! "
पुढे पुढे चाललो भारतीय एकसाथ.

## महाराष्ट्राच्या सह्यगिरी

महाराष्ट्राच्या सह्यगिरी तव शिखरे उठती वरी वरी
आकाशाची झालर तू, तुज पाहुनि गद्‌गद होइ उरी.
कंठ दाटतो अभिमानाने पत्थर पाहुनि तुझे निळे
इतिहासाच्या धारातीर्थी रक्त–मावळे इथे गळे !

तानाजीचा कडा खडा हा सदूर दिसतो कोंडाणा
'सिंहगडा'ची पदवी घेई किल्लेकोटांचा राणा.
पत्थर 'असले' पत्थर कसले ? जिवंत स्फूर्ती त्यात झरे
खडकांमधले 'जीवन' बघुनी कल्याणाचा नेत्र झरे !

'समर्थ' पदस्पर्शाने झाला पावन तव, रे, कडाकडा
बाजीप्रभुच्या मरणे लाभे 'पावन' खिंडी 'पन्हाळ्‌गडा'
स्वराज्य–तोरण 'तोरण्या'वरी उभारण्या दे 'शिवनेरी'
शिवअवतारी महाराष्ट्राला 'रायगडा'वर छत्र धरी !

किल्लेमावळ तव वक्षावर उन्नत माथा भूषविते
सह्याद्रीच्या महाप्रस्तरा ! कोटी वंदन तुला इथे
उंच 'हिमालय' अमुचा तू अन् 'भीमाशंकर' 'कैलास'
'महाबळेश्वर' 'गौरीशंकर' 'कळसू' ला व्योमी ध्यास !

'गोदा' अमुची 'गंगामाई' 'त्र्यंबकेश्वरी' अन् 'काशी'
'भीमे'च्या वाळूत सांडल्या पुण्याच्या कांचनराशी !

कूजिते आणि गर्जिते

'विश्वेश्वर' हा उभा विटेवर अमुची 'पंढरि' जागवितो
'आळंदी', 'देहू', 'तुळजापूर', ' पैठण' तीर्थे मी स्मरतो.

'तुळजापुर'ची माय भवानी असिधारा दे हातात
स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ अन् असंख्य मुंड्या न्हातात !
भगवा झेंडा स्वैर फडफडे थरारवूनी सह्यकडा
महाराष्ट्राच्या डफाडफावर सह्यगिरीचा पोवाडा !

## मी महाराष्ट्र म्हणतो तेव्हा—

मी महाराष्ट्र म्हणतो तेव्हा
तो शिवबाचा महाराष्ट्र असतो
त्याच्या स्वातंत्र्याच्या जोमात
हिंदवी स्वराज्याचा प्रपंच वसतो
राजकीय महाराष्ट्र
भारताची चिंता वाहातो
भारत स्वतंत्र राहावा म्हणून
स्वातंत्र्याचे बीज जपतो

मी महाराष्ट्र म्हणतो तेव्हा
मराठी संतांचा निर्वाळा असतो
आपले कुटुंब विसरून मराठा
वसुधैव कुटुंब करू पाहातो
सिंधुगंगेच्या उमाळ्याने
माझा महाराष्ट्र गहिवरून येतो
भारताची दुःखे पाहून
स्वतःची शल्ये विसरून जातो

स्वातंत्र्याचे वारे प्यालेला
माणुसकीचे तीर्थ प्यालेला
माझा महाराष्ट्र भारताचा खड्गहस्त होतो

सहानुभूतीने उफाळून येताना
मराठी मनातून भारतीयत्व जगतो !

मी महाराष्ट्र म्हणतो तेव्हा
जगण्याची जिद्द अभिप्रेत असते
आपल्या जीवनाच्या छायेत
भारतीयत्व जपायचे असते
माझ्या अशा महाराष्ट्राला
इडापिडा लागायची नाही
नियतीला पुरून उरेन
मराठी जिद्द सरायची नाही !

## अस्मिता

मी
माणूस आहे—
स्वतंत्र राष्ट्राचा स्वतंत्र नागरिक !
आणि
एक कारागीर.
परंतु,
मला प्रथम माणूस म्हणून जगावयाचे आहे--
माझा मान, माझा अपमान...
न्याय आणि अन्याय...
माणुसकीच्या साऱ्या खुणा
मनुष्यपणाचा सच्चा कणा
यांची चाड बाळगून
मला जीवन जगायचे आहे !

* * *

मी पिकवीन, मी खाईन
मी निर्मीन, उपभोगीन
कोणाच्या मर्जीच्या भिकेवर
ऐश्वर्याचे जीवन जगणार नाही !
वरी, नाचणीची भाकर

( असेल तर दूधसाखर,
नसेल तर पाणीच चुळकाभर )
हे माझे स्वातंत्र्य !
आणि हे नसेल
तर,
ऐश्वर्य वा सुखलोलुपता
( दुसऱ्याच्या मर्जीतून लाभलेली
शेपूट हलवून मिळवलेली )
ते हतदग्ध पारतंत्र्य !
अस्सल स्वातंत्र्य मला जगायचे आहे.
मातीतून पिकवून खायचे आहे
सगळ्यांनी विभागून ल्यायचे आहे !
मनगटात दम धरून जगायचे आहे !

* * *

आणि,
माणूस म्हणून जगण्याची हमी
स्वतःच्या कर्तृत्वाने मिळविल्यावर,
माझे स्वातंत्र्याचे नाणे
सोन्याच्या मोहोरेसारखे पारखून घेतल्यावर,

२४९०

मला माझी कारागिरी
फुलवायची आहे, घडवायची आहे....
कारखान्यातून, ऐरणीवर
जात्यातून वा दात्यातून
कामकरी म्हणून वा कलावंत म्हणून,
माझी कारागिरी घडवायची आहे !
वैभवाचा साज निर्मायचा आहे !
आणि,
मला, माझ्या लोकांना, माझ्या समाजाला
माझ्या देशाला, माझ्या राष्ट्राला
आणि
विश्वबंधुत्वालाहि
मग, तो साज चढवायचा आहे,
मराठी मातीशी इमान राखून !

# स्वगत

कित्येक वर्षे माझ्या मनात
एकच स्वगत घुमते आहे,
‘ माझे राष्ट्र घडलेच पाहिजे,
माझे राष्ट्र जगलेच पाहिजे.’
माझे रक्त, माझा घाम
माझे अश्रू झरलेच पाहिजेत !
माझ्या भोंवती गोंधळ आहे
कोणी काही पिकवीत नाही
कोणी काही उभवीत नाही
कोणी काही निर्मीत नाही
कोणी काही टिकवीत नाही.
धन मात्र साऱ्या हवे
कोणी कुठे राबत नाही
भाव उंच चढत आहेत
दाणा वैरण कमी आहेत
रोमला आग लागली आहे !
तरी दिल्रुबा वाजत आहे ! !
आता मात्र माझे स्वगत
मनाच्या गाभाऱ्यात घुमत आहे
गाभाऱ्याला तडे पडून

स्वगत मोकळे सुटत आहे
आणि, माझे स्वगत एक
प्रचंड गर्जित होत आहे
मी उभा ठाकलो आहे
श्रद्धा माझी अचल आहे
राष्ट्रजीवन काळवंडणारे
दुर्गुण आता सरलेच पाहिजेत
माझे राष्ट्र घडलेच पाहिजे
माझे राष्ट्र जगलेच पाहिजे
सातवाहन, शिवरायाचे
तानाजी अन् संताजीचे
मराठशाही, पेशवाईचे
माझे राष्ट्र घडलेच पाहिजे !
माझे राष्ट्र जगलेच पाहिजे ! !

# नीतिसूत्रे

प्रथम, नीतिसूत्रे असावी लागतात
पण, ती केवळ असून भागत नाही
ती समजण्यासाठी शिक्षण लागते
आणि
या शिक्षणाने
माणसांच्या कळपाचा समाज होतो.
समजलेली नीतिसूत्रे उमजण्यासाठी
ती राबविणारी अधिसत्ता लागते
आणि, अशी अधिसत्ता
त्या समाजाच्या स्वातंत्र्याची हमी देते;
तेव्हा त्या समाजाचे राष्ट्र उभे राहाते.
या राष्ट्राचे घटक
अशा नीतिसूत्रांना जागून
त्यांच्यासाठीं
( म्हणजेच स्वतःच्या अस्मितेसाठी )
आपल्या सर्वस्वाचा
होम करावयास तयार होतात.

## मूठभर !

मी ( विवस्त्र ) जन्मलो
तेव्हा
माझी मूठ मिटली होती;
कुणी म्हणे वैभवाची
कुणी म्हणे सव्वालाखाची
खरोखर, झाकली मूठ
चोरट्या, लपल्या सव्वालाखाची
रावपणाची, रंकतेची--
शहाणपणाची, मूर्खतेची--

* * *

माझी मूठ मिटली होती
जगासाठी झाकली होती—
माझ्यासाठी झाकली नव्हती !
माझ्या मुठीत
मराठी संतांचा विश्वकुटुंबी वारसा होता
माझ्या मुठीत
शिवरायाच्या स्वतंत्रतेचा वारसा होता
माझ्या मुठीत
अन्यायाविरुद्ध बंडखोरीचा वारसा होता.

अशा साऱ्या भणंगांच्या
दारिद्र्याचाहि वारसा होता.
माझी मूठ वळली होती
ठोशास ठोसा देणाऱ्या मनगटावर
माणूसकीला लाजविणाऱ्या दैत्याच्या
मानगुटी बसणाऱ्या मनगटावर !
मी विवस्त्र जन्मलो होतो
मी विवस्त्र जगू शकत होतो
कारण,
माझ्या मिटल्या मुठीत माती होती
विवस्त्र मेल्यानंतरची मूठभर माती
जी पुन्हा मराठी मातीत मिळणार,
मराठी मातीशी इमान राखून !

मराठा तितुका मेळवावा
अन् असा मराठा मेळवावा
जो ब्राह्मण नाही आणि अब्राह्मणहि नाही,
जो मराठा आहे
कारण त्याचे मराठी मातीशी इमान आहे !
कृष्णा, भीमा, गोदा, तापी, नर्मदा
यांच्या जलोदकात ज्याला पुण्यतीर्थ मिळते
सह्याद्री, अजिंठा, सातपुडा यांच्या गिरिशिखरांतून
ज्याच्या स्वातंत्र्याचे वारे भरारते
शिवरायांचा प्रताप आठवून
ज्याची काया रोमांचित होते
तानाजी अन् बाजी प्रभूंच्या मरणातून
ज्याचे हौतात्म्य जागून उठते
थोरल्या बाजीरावांच्या पराक्रमाने
ज्याची छाती स्फुरण पावते
अटकेपल्याडच्या ध्वज फडफडीत
ज्याचे ह्रदय आजहि धडधडते
सातारा नि कोल्हापूर यांच्या वाटणीने
ज्याचे मन हळहळून तुटते
नारायणरावांचा खून् अन् रावबाजीची कर्तबगारी

यांची ज्याला लाज वाटते
मराठी संतांच्या कवना–भजनांतून
ज्याचे अंतर उचंबळून येते
मराठीच्या उद्‌घोषातून
ज्याची अस्मिता सजीव होते
असा मराठा मेळवावा
महाराष्ट्रधर्म जागवावा !

* * *

या मराठ्याचे मन मराठी
त्याच्या तनूची माती मराठी
त्याच्या धमनीतील रक्त मराठी
त्याच्या रोमरंध्रांतील घाम मराठी
त्याच्या डोळ्यांतील अश्रू मराठी
त्याच्या फुफ्फुसातील श्वास मराठी
त्याला मराठी दारिद्र्याची खंत
निर्मिल्याविना, पिकविल्याखेरीज
ज्याच्या मनाला मुळी ना उसंत
असा मराठा मेळवावा
समाजधर्म जागवावा !

* * *

मराठी समाजाचे दारिद्र्य न संपो
पण एक मराठी दरिद्री असेल
तोवर महाराष्ट्रात श्रीमंत सापडणार नाही
मराठी दारिद्र्याला समाजधर्मातून
शाश्वती मिळेल, हमी लाभेल
खाण्यापिण्याची, वस्त्रप्रावरणाची
घरादाराची आणि घामाच्या कामाचीहि !
कारण, मराठी वैभव मराठी श्रमांतूनच फुलेल
मराठी देह मराठी अन्नावरच वाढेल
मराठी पाण्यावर पिकलेल्या शेतीतून
हिरव्या जीवनाने अंकुरणाऱ्या मातीतून
मराठी वाऱ्यावर डोलणाऱ्या कणसांतून
मोठा दाणा–कणखर हाड
माणसामाणसांतून राष्ट्राची वाढ
कसलेला काचा अन् घोड्यांच्या टाचा
असा जो मराठी जागून उठेल
असा मराठी मेळवावा
स्वातंत्र्य धर्म जागवावा !

* * *

असा मराठा मेळवावा
जो ब्राह्मण नाही अन अब्राह्मणहि नाही
पण तो मराठी शब्दाने पुलकित होतो
मराठी इतिहासातून स्फूर्ति घेतो
मराठी वैभवाची भविष्यस्वप्ने पाहात
मराठी घाम आणि मराठी रक्ताने
वर्तमानकाळाचा क्षणन् क्षण जगतो !

## अश्रू

मुक्ताबाईच्या शब्दामध्ये
" ताटी उघडा " ऐकताना
माझे डोळे विरघळतात
अन् दोन अश्रू उभे ठाकतात
वाळीत पडलेल्या ज्ञानदेवाचे
समाजाच्या कढईत व्यक्तित्व वितळते
प्रल्हादाच्या काहिलीतून
परमात्म्याचे दर्शन होते.
तरारलेले माझे अश्रू
ज्ञानेश्वरीने निवून जातात
ओथंबलेल्या अंतराने
मराठमोळी ओवी गातात.

* * *

समाजाने लुबाडलेला, छळलेला तुकाराम
भोळे भाबडे त्यांचे अंतर, ईश्वरभक्ती एक काम
समाजाच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्यात तोहि दंग
एकतारी वाजत राहाते देहूचे स्फुरतात अभंग
तुकोबाच्या जीवनाने पुन्हा अश्रू तरळून येतात
अभंगांच्या गुंजनातून त्यांच्या वाफा निवून जातात

सावता माळी, गोरा कुंभार, नामदेव वाणी, चोखा महार
समाजाची सरस्वती बहरून येते अपरंपार
भक्तीरसात नाहलेले अश्रू डोळे भरून वाहतात
मराठीच्या वात्सल्याने कंठाला गहिवर आणतात.

* * *

मावळातील पत्थर पत्थर जिथे रक्तात भिजून गेला
तिथे माझे अश्रू झरतात श्रद्धांजलि अर्पिण्याला
स्वातंत्र्याची आग जेव्हा अंतःकरणात उसळून येते
अश्रूंची त्या वाफ होते, निर्धाराचे गीत उठते
सातवाहनांचा ठेवा माझे अश्रू टिपून घेतात
विजयनगरचे वैभव पाहून आदराने गहिवर होतात
रायगडाच्या कड्यावरून नव्या ऊर्मी उसळून येतात
विशाल महाराष्ट्राच्या आरोळीने समर्थ जैसे सावध होतात
वीर बाजी, तानाजी, अन धनाजी अन संताजी
तिलांजली वाहताना माझे अश्रू वचन देतात
वासुदेव बळवंतांच्या ओंजळीतील मातीचे इमान स्मरतात
विनायक दमोदर विश्वासाने संकटाचे सागर तरतात
स्वतंत्र आम्ही जन्मा आलो स्वातंत्र्यातच आमचा मोक्ष
बरोबर येतील त्यांना साथ स्वातंत्र्याचा आमचा पक्ष

रेंगाळणारे खुशाल रेंगाळोत पायात पाय बांधणार नाही
जड धोंडे गळ्यात बांधून पारतंत्र्यात बुडणार नाही ;
भारताचा वारसा आहे 'सत्' जे असेल त्याच्यासाठी
माझे अश्रू झरले होते सिंध, पंजाब, बंगालसाठी
हिमालयाच्या उंचीने मी अमर्याद मोहित होतो
सह्याद्रीच्या शृंगशृंगी तीच उंची मोजित राहातो
गंगा माईच्या पावित्र्याने माझे डोळे ओले होतात
महाराष्ट्राच्या सरिता सरिता गंगोत्रीतून उगम पावतात
स्वातंत्र्य जर धोक्यात आले, मन्रो तत्त्व मी समजतो
महाराष्ट्राचा महाराष्ट्रासाठी महाराष्ट्राकडून उदय पाहातो
स्वातंत्र्याची पिंड तिथे कल्पान्तापर्यंत पुजायची आहे
माझ्या पवित्र अश्रूंमधून अभिषेक तिला व्हायचा आहे
संतांच्या पावित्र्याचे वीरांच्या निर्धाराचे
माझे अश्रू ओसरायचे नाहीत; माझे अश्रू निवायचे नाहीत.

# स्वातंत्र्य

मी उभा असेन तेथील भूमीचा कणन् कण
स्वातंत्र्याचा बनलेला असेल
मी श्वास घेईन त्या वातावरणाचे अणुरेणू
स्वातंत्र्याने भारलेले असतील,
माझ्या श्रमांनी उभविलेल्या समृद्धीच्या
वास्तुशिल्पावर मला माझ्या स्वेदगंगेचा
अभिषेक करता येईल
मी मान ताठ ठेवून अभिमानाने चालू शकेन
मला किंचित्कालहि कोणाकडे लाचारीने
बघावे लागणार नाही
माझा मान आणि माझा अभिमान
निष्कलंक राहील
असे स्वातंत्र्य मी निर्मीन
तेव्हाच, जीवनमानाची भ्रामक तमा न बाळगता,
समाधानाची, चारित्र्याची, निष्ठेची
भाकर खात
मी स्वतंत्र म्हणून जगेन.

## कर्तव्य

दुष्ट भ्रांत कल्पनांना        आमुचा न पडो बळी
'कर्मण्येवाधिकारस्ते'        समाजास ही आरोळी
कर्तव्य प्राप्त मार्गाने        घडो पुण्य, घडो पाप–
कर्तव्य ते करायाचे        हिशेब हो आपोआप !

## वञ्चना

दोष स्वतःचे झाकण्या वञ्चना का जगताची ?
जग असे नच फसे वञ्चना ही स्वजीवाची !
बुरुजाची कुणी भेग वरी कितीहि झाकली
जरा भूमी हादरता बुरुज तो येई खाली
भेग भेग जाणोनीया दोषादोष म्हणोनिया
सुधारणा करण्याची आचरावी योग्य क्रिया !

## परंपरेची मशाल

परंपरेची मशाल    प्रतिभेने तेवणारी
हिंदी साम्राज्य विशाल    प्रकाशे उजळणारी
उद्याच्या पिढीच्या हाती    सन्मानात सोपवून
'सन्मानाचे जिणे जागा'    मन्त्र त्यांना हा सांगून
मावळत्या जीवतति    उमलत्या राष्ट्रजिवा
सत् चित् मंगल तालात    समर्पिती तया ठेवा
सतेज अमर ज्योती    प्रत्येक पिढीचे हाती
तिच्या प्रकाशात वाट    पिढ्यापिढ्या चालताती
उत्कर्षाच्या ध्रुवाकडे    मांगल्याच्या प्रभेकडे
अज्ञानतिमिरातून    ज्ञानोदय पूर्वेकडे !

## आमचे ब्रीद

पूर्वजांच्या वैभवाची दौलत सांभाळायाची
थोरतेची धुरा आम्ही उचलून धरायाची
दोष त्यांनी जे जे केले ते ते आम्ही टाळायाचे
मशालीच्या प्रकाशात पुढे पुढे चालायाचे.

## निर्वासित—

आज माझ्याच राष्ट्रामध्ये मीच चोर ठरलो आहे
मायभूच्या सीमांमध्ये निर्वासित झालो आहे
सख्ख्या आईच्या छपराखाली सापत्नता मिळते आहे
जीवनाची जिगीषा अन् कणाकणाने जळते आहे

घर लुटले जात आहे, मुसक्या पक्क्या बांधल्या आहेत
स्वातंत्र्याचे नारे ऐकण्यास कान मात्र उघडे आहेत
गोंधळ-कल्लोळ वाढतो आहे, मला त्याचे सुतक आहे
बोलता येत नाही ! करता येत नाही ! माझेच काही पातक आहे

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा लोळ मला गिळतो आहे.
आज माझ्याच राष्ट्रामध्ये मीच उभा जळतो आहे.

कुणीहि उठावे आणि समाजवाद सांगावा
आणि कुणी लोकशाहीचा महिमा गावा.
कुणी समाजवादी लोकशाहीवर बोलावे
तर कुणी लोकशाही समाजवादावर !
शब्दांचा महिमा अर्थाला वाण नाही
शब्द तेच वापरूनहि अर्थाचा बाण नाही.
समाज चेतन असेल तर समाजवादाचा अर्थ दिसेल;
लोकांचे मोजमाप असेल तर लोकशाहीचा प्रभाव असेल.
गट आहेत, गोट आहेत, नेते आहेत, वक्ते आहेत;
समाजवाद घडत आहे, लोकशाही रुजत आहे.
समाजातून वगळण्याचा कोश विणता येईल तर
कोशामध्ये व्यक्तिशाही एकवाद जगता येईल.
बंद कवाडे, उभ्या भिंती; काळा चांदवा, अंधार सारा
सर्व अगदी ठाकठीक चिंता नाही खेद विसरा.
प्रलय काळ आलाच तर ज्वालामुखी लाव्हा झरेल
धरणीकंप झालाच तर भिंती पडतील, भेग भरेल.
हसतील समाज, हसेल इतिहास त्यांच्या कवळ्या विस्कटतील;
आम्ही उरणार नाहीच तिथे आमचे काय वाकडे होईल ?
इतिहासाची आम्हांस चिंता ? मुळीच नाही ! का असावी ?
भवितव्याची आम्हांस काळजी ? मुळीच नाही ! का असावी ?

राष्ट्र म्हणून जगण्याचा अट्टाहास का करावा ?
उद्याबद्दल चिंता करीत मरणघट का भरावा ?
अस्तित्वाचे तत्त्वज्ञान आमच्यासाठी ठीक आहे,
संहतीचा, अस्मितेचा प्रश्नच आम्हांस फिका आहे.
जग जायचे तिथे जावो आम्ही आमचे अस्तित्व जगू;
पानावर बसल्या मुंगीसारखे प्रवाह नेईल तसे तगू
वर्तमानकाळच काय तो सत्य, आजचे जीवन तेच खरे
भूतकाळाची दाद नको भविष्यकाळ उधार रे !
जीवनाचे हे तत्त्वज्ञान आणि तत्त्वज्ञाचे हे जीवन !
अस्तित्ववाद आम्हा आधार नैष्कर्म्य जीवन वा मरण
असे आम्ही जगू मरू, स्पंदन चालू राहील तोवर
भारतीयत्वाचा वारसा सांगू भलेबुरे होईल तोवर !

समाजाला देह आहे
सुखासुखी बुडणार नाही
त्या देहात आत्मा आहे
सुखासुखी मरणार नाही.
न पोहणारा आळशी माणूस
घरंगळत नदीत पडतो
"अधःपात झाला, मेला
विचारा !" असे कोणी म्हणतो
परंतु मरण इतके सोपे ?
नाकी तोंडी पाणी जाते
जीव गुदमरतो तेव्हा
जगण्यासाठी धडपड होते.
हातपाय अशी तडफड करतात
चुकून पोहणे आचरून जातात
आणि बुडणारा तरून जातो
आळशी पुनर्जन्म जगतो.
असा माझा समाज देखील
बुडता बुडता तरून जाईल
मरण इतके सोपे नाही
म्हणून तरी जगून राहील.

एवढी तरी संभाव्यता
एवढी तरी एक शक्यता
भोवती अंधार दाटत आहे ?
एवढी आशेला जागा आहे !

# परंपरेचा धागा

परंपरेचा धागा तुटला का ?
पुरातन काळापासून
आम्ही परचक्रावर मात केली.
स्वार्थत्याग, प्राणत्याग
यांची कास धरून
आम्ही आपली इज्जत राखली.
काल परवापावेतो
आम्ही मोगलांना धक्के दिले
आपले स्वातंत्र्य जतन करून
औरंगझेबाचे थडगे केले !
दख्खनच्या बरगडीत
लाथ घालायला शहेनशहा आला
'उंदरांची अवलाद' म्हणाला
अन् त्याच बिळात दफन झाला.
इंग्रजांची सत्ता झुगारण्यास
सर्वस्व आम्ही पणास लावले
भय अम्हांस उरलेच नाही
मृत्युंजयाचे स्थान लाभले.
अंगभर वस्त्र नाही
पोटभर अन्न नाही

पण कशाचाहि मोह पडला नाही
असे दीड शतक आम्ही झगडलो.
स्वातंत्र्य मिळविल्याविना विसावणार नाही
असा निर्धार आम्ही जगलो.
अडीच युगांची जीवनक्षमता
दीड हजार वर्षांची कर्तबगारी
दीड शतकाची संतत लढाई
दीड डझन वर्षांत सरली सारी ?
असे कोणते चेटूक झाले ?
भारतीय स्वातंत्र्य अम्हा मिळाले ?
स्वार्थत्याग उरला नाही
स्वातंत्र्याचे मोल समजत नाही
अपुरा आहार, काळनिद्रा,
अवास्तव भय, पशुवत् मैथुन
यांची झापड आमच्यावर आली
आमची शुद्ध बुद्ध हरपली.
परंपरेचा का धागा तुटला ?
आठवत असून विसर पडला ?
असा कोणता मिळाला शाप ?
यातून कसा लाभेल उःशाप ?

शब्दांसारखी कृती घडते
तेव्हा शब्दांना अर्थ लाभतो
कृतीनंतर शब्द स्फुरतात
तेव्हा स्वयंसिद्ध अर्थ असतो.
पण केवळ शब्द; कृति नाही
शब्दांचे हे फोल बुडबुडे
नाही रस नाही अर्थ
केवळ तेथें भकास जबडे
शब्द नि कृति यांमधील दरीचे
निष्फल नीरसतेच्या कुशीचे
असे शब्द इतिहास लिहीत नाहीत;
असे शब्द इतिहास घडवीत नाहीत !

## झगडा

स्वतःच्या सामाजिक श्रद्धा
स्पष्ट नि स्फटिकीभूत झालेल्या—
समाजजीवनापेक्षा भिन्न असतात
तेव्हा प्रवाहपतिताप्रमाणे
समाजगंगेत वाहत न जाणे
आणि समाजजीवनास बांध घालून
आपल्या श्रद्धांनुसार वळविणे
असिधाराव्रताहून कठीण असते;
त्यासाठी भगीरथ प्रयत्न लागतो.
परंतु या श्रद्धा स्पष्ट झाल्यावरही
जेव्हा मन असिधाराव्रताचे आव्हान
स्वीकारू शकत नाही
तेव्हा या झगड्यात
मानसिक दुर्बलतेमुळे त्या मनाने
हार खाल्लेली असते.
ही मनोदुर्बलता असह्य असते.
कारण, तिच्यात व्यावहारिक जीवन आणि नैतिक मरण
अ-पृथक्‌पणे सामावलेले असते.
पाशवी जीवनाचा तो जीवनश्रद्धेवर विजय असतो
हा अस्तित्वासाठी दिलेला अस्मितेचा बळी असतो.

असे जीवन स्वीकारावयाचे की श्रद्धांशी इमान राखून
प्रवाहाविरुद्ध पोहत राहावयाचे
हा झगडा, हे आंतरिक लढ्याचे बीज
आणि या झगड्यात
परिस्थितीने जीवनश्रद्धांवर मात केली
तर
तदनंतरचे जीवन मरणप्रायच !

## लुमुम्बा

माझ्या मनात एक लुमुम्बा दडला आहे
गुदमरलेला त्याचाहि श्वास अडला आहे
माझ्या मनात एक लुमुम्बा दडला आहे

राष्ट्राच्या राष्ट्रीयत्वाची त्याला जाणीव आहे
राष्ट्रउभारणीच्या कार्याची नेणीव आहे
आजच्या मिळमिळीत जीवनाशी त्याचे वाकडे आहे
आजच्या समस्यांचे त्याला साकडे आहे
परन्तु, लुमुम्बाच्या फुफ्फुसांतला वारा पडला आहे
गुदमरलेला त्याचाही श्वास अडला आहे.

'माझा लढा' मनात पारवे घुमत आहेत
'तुझे राष्ट्र' वेद नि संहिता गात आहेत
'जननी–जन्मभूमिश्च', मनात कोणीतरी कण्हत आहे
'आकाशच फाटले' आकाशवाणी म्हणत आहे
स्वप्नातील क्रूसावर माझा लुमुम्बा चढला आहे
गुदमरलेला त्याचाही श्वास अडला आहे.

पूर्वेकडे पिवळे पिशाच्च उठले आहे
लाल रॉकेट रोवून भविष्य दटले आहे
काळ्या खंडात स्वार्थ थैमान घालतो आहे

कसाई कटंगा काँगो–केळे सोलतो आहे
लुमुम्बाचा जीव काहिलीमधे कढला आहे
निःशक्त लुमुम्बा माझ्या मनात दडला आहे.

काँगोचा कलिजा राष्ट्रवेदीवर चढला आहे
माझा लुमुम्बा वठलेल्या मनात सडला आहे
माझ्या मनात दीन लुमुम्बा दडला आहे
गुदमरलेला त्याचाही श्वास अडला आहे.

7890

## गिझेंगाच्या बराकीतून

गिझेंगाच्या बराकीतून मी माझा देश पाहातो
नयनांतील अश्रुपूर ओसरून माझा मीच नाहातो
काँगो नदीच्या किनाऱ्यावर कारखान्याचा धूर लोटतो
परकीयांच्या खिशामध्ये धनाचा पूर ओततो.
तळपत्या बागनटांच्या संगिनी वखवखल्या नजरेने
विषुवाच्या तिरिपीत तळप तळप तळपतात
आणि लष्करी पोशाखधारी माझे सैनिक
चोर सोडून माझ्यावरच पहारा करतात.
माझा नंगा देश अनवाणीपणे उन्हात काळा पडतो
गिझेंगाच्या बराकीतून असा माझा देश मी पाहातो !

नव्या नव्या वाहनांचे आवाज रस्ता कापीत जातात
आणि आपल्या तीक्ष्णतेने माझे काळीज चिरीत जातात
वाहनात बसलेले पुष्पमालातील गळे हसरे चेहेरे सावरतात
पुढाऱ्यांच्या पिकावरील कणसांसारखे देशभक्त वावरतात
त्यांची लयलूट ! त्यांचें भलें ! लोकसभेतून फुलते आहे
लुमुम्बाचे भूत मात्र गिझेंगाच्या बराकीत हलते आहे
कायदा अन् सुव्यवस्था यांचे नाटक रंगते आहे
देश सुस्थिर होतानाही राष्ट्रप्रेम खंगते आहे
' काल ' तर वाईट होता, ' आज ' बद्दल कळत नाही

‘उद्या’ अगदीच अनिश्चित निष्कर्ष हा टळत नाही
अनिश्चिततेच्या वातावरणात नवी पिढी फुलत आहे.
गिझेंगाच्या बराकीतून विश्व असले सलत आहे.

जनशक्तीची स्वेदगंगा काँगो नदीतून वाहात आहे
काँगोच्या संगिनींनी काँगो रक्त गळत आहे
काँगोचा अश्रुपूर फुकाफुकी झरत आहे
काँगोचा खजीना निष्कारण सरत आहे
कर्जाचा बोजा आज काँगोवर वाढत आहे
तैनातीच्या मोबदल्यात काँगो देश विकत आहे
प्रेमाच्या आळ्यातून द्वेषाचा वेल अंकुरत आहे
काळ्या खंडाच्या अंतरंगात काळा अंधार दाटत आहे
तरी वैराण काँगोमधून डांबरी नाग पळत आहे
आपले सुख, आपला स्वार्थ : राष्ट्र-हृदय जळत आहे !

गिझेंगाच्या बराकीतून असा देश दिसतो आहे
आरशाच्या तुकड्या-तुकड्यात विषण्ण काळ हसतो आहे
खाकी वर्दी नंगे पाय वाम सव्य करीत आहेत
बागनटांच्या संगिनी राष्ट्रीयता कोंडीत आहेत
जग पुढे धावते आहे; यूनो आहे, रॉकेट आहे,

देशाला ताप भरत आहे, तापात शुद्ध हरत आहे,
बरळण्याला बहर आहे, बैठकीचा कहर आहे,
'खडे होपू' चालूच आहे, कढईत तेल उकळत आहे
गिझेंगाच्या बराकीतून सारा देश दिसत आहे
बराकीतील राष्ट्रीयता हळूहळू पुसत आहे

# सामर्थ्य

या सीमेवर अन् त्या सीमेवर
सतत गोळीबार चालूच आहे
इथे माझ्या मुलुखात परकी ठाणी आहेत
अन् तिथे निर्लज्ज आक्रमण आहे
इंच इंच भूमी लढविण्याच्या
आणि तसू तसू आक्रमण निवारण्याच्या
माझ्या सरकारच्या धमक्या घुमत आहेत
पण गोळीबाराच्या धूमधडाक्यात
आणि भयभीतांच्या किंकाळ्या–आक्रोशात
धमक्यांचे शब्द बुडून जात आहेत.
साध्या धमक्याच नव्हेत
तर अंतिमोत्तरांच्या फैरी झडू लागल्या आहेत
आणि गोळीबाराचा आवेग वाढूनहि
अंतिमोत्तरांचा मोरावळा बनत आहे!
निषेधखलिते पाठविण्यासाठी
कचेऱ्या नि कर्मचारी वाढत आहेत
नि कागदाचे कारखाने चालत आहेत

या सीमेवर अन् त्या सीमेवर
सतत गोळीबार चालूच आहे

माझ्या मुलुखात परकी ठाणी नि निर्लज्ज आक्रमण
मूळ धरून रुजत आहे.
आर्थिक प्रगतीचा रथ जगन्नाथाच्या रथासारखा
पुढे पुढे सरकत आहे
लोकशाहीचा वृक्ष फोफावत आहे
योजना फलद्रूप होऊ लागल्या आहेत.
अलिप्ततेचे धोरण निःसंशय यशस्वी झाले आहे.
हिमालयाची आर्त हाक ऐकून सह्याद्री म्हणे
धावून गेला आहे!
अन् गोंधळ वाढत आहे,
की हा केवळ गोंधळाचा भ्रम आहे?
माझा समाज उद्या जगायचा आहे
त्यासाठी मला स्वास्थ्य नि स्थैर्य हवे आहे
आणि ठगी सुरू झाली नि पेंढार बोकाळले
तर मी काय करणार आहे?
मादाम ट्यूसेड्स्च्या प्रदर्शनातील
मेणाळ पुतळ्यांच्या मेणाळ डोळ्यांनी
भोवतालच्या घटना पाहाणार आहे?
की--
चहाच्या कपात वृत्तपत्र बुडवून

खाणार आहे ?
नि माझ्या भवितव्याच्या भल्याबुऱ्यांचे गाठोडे
नियतीच्या खांद्यावर टाकून
नि ग्रहमालेच्या कर्तबगारीला बोल लावीत
असहायपणे कडाकडा बोटे मोडणार आहे ?
हेच माझे सामर्थ्य असेल
तर माझ्या राष्ट्राचे नि सरकारचे सामर्थ्य
असेच स्वयंभू आहे,
इतकेच प्रभावी आहे
नि चिरंतन आहे !

# पोट आणि पाठ

“ पोट पाठीमागे लागले आहे ना
म्हणून वाटेल ते सहन करावे लागते ”
असे म्हणतात—
आणि पोटावर हात फिरवणारी
ढेरपोटी मंडळी
“ पाठीवर मारा पण पोटावर मारू नका ”
असला भंपक कांगावा करतात.
पण मला वाटते
खरोखरच जेव्हा पोट खपाटीला जाईल
आणि पोट ‘ पाठीला ’ लागेल
तेव्हा तो प्रज्वलित जठराग्नी
क्रांतीचे यज्ञकुंड पेटवील
परिस्थितीविरुद्ध बंड उभे राहील
आणि उपासपोटी हुतात्म्यांच्या
राखरांगोळीतून
समृद्ध, प्रबल राष्ट्र उभे राहील !

# इच्छाशक्ती

बंदुकी अन् तोफा लढत नाहीत
की त्यांचे चाप ओढणारे वा कळ दाबणारे हात;
त्यांच्या मागची हृदये लढतात
आपल्या अदम्य इच्छाशक्तीवर
नि ठाम निर्धारावर.
अढळ श्रद्धेच्या इच्छाशक्तीला
तोफाच काय अणुगोलकही चिरडू शकत नाहीत
कारण न्याय आणि सत्य यांचे चिलखत
पांघरून ती इच्छाशक्ती पवित्रा घेते
आणि मग मूठभर लोकांचे राष्ट्रही
अमरपणे जगत राहाते
यावच्चंद्रदिवाकरौ !

## रायगडाला जाग येते

रायगडाला जाग येते तेव्हा
सह्याद्रीची क्षितिजावरची झालर पाहून
उरी गद्‌गदणारे मराठी मन
भारताच्या स्वातंत्र्याच्या 'उद्या' ची
चिंता बाळगते.
आणि ही चिंता बाळगण्याची धडपड
करीत असता
महाराष्ट्राचे जन्मजात शल्य समजून
स्वार्थत्यागी नव्या भगीरथांचे
नवे सोनेरी स्वप्न रंगवते.
पिता पुत्र दोन बुरूज
अन् रायगडाचे दोन बुरूज
एकमेकाला समजले नाहीत
आणि बुरुजांची माती होऊन
काळ्या पहाडासारखे धीरोदात्त हृदय
उघडे पडले.
चौदा भाषांच्या पाच वंशांचे
भारतीय बुरूज
मातीला मिळणार नाहीत
मातीमोल होणार नाहीत.

रायगडाला जाग येईल
आणि
अग्निप्रलयात अश्वत्थ उरेल
जलप्रलयात पिंपळपान तरेल
हिंदवी स्वराज्याचा पाळणा जोजवीत !

जो खरा समर्थ असतो
तो बोहोल्यावर लाथ मारून
नि तीन बोटांची लंगोटी लावून
राष्ट्र उभे करू शकतो.
कारण तो खरा समर्थ असतो
आणि हे सामर्थ्य जिथे नसते
तिथे पोराबाळांचा संसार चिरचिरतो
परिस्थिति अधिक बलवान ठरते
आणि त्याचे शब्दांचे बुडबुडे
मोठमोठे होऊन फुटतात--
आणि राष्ट्राची रांगोळी होतच राहाते !

# मरण

मरण असे जर येणार मला
दुःख तयाचे नाही
या मरणाच्या मिठींत मिटण्या
मनोधैर्य मज देई.

इथे नाडले मानव भंवती
त्या तापातुनि मिळण्या मुक्ती
झटता झटता, खिळे ठोकिले
हाती-पायी क्रूसावरती-
खेद मला, प्रभु, नाही
या मरणाच्या मिठीत मिटण्या
मनोधैर्य मज देई.

मनास पटते, सत्य वाटते
निर्भिड जिव्हा तसे बोलते
सत्याच्या श्रद्धेची पाखर
सॉक्रेटिसचा पिण्यास पेला
खंत मनाला नाही
या मरणाच्या मिठीत मिटण्या
मनोधैर्य मज देई.

करिता कर्तव्याचे पालन
बुद्धिदीप हृदयामधि लावुन
स्वधर्म-मरणी नयनी सळया....
जीभ ओढुनी, विटात चिणुनी
संभाजी राजांचे मरणहि
अखेद मजला येई
हे मनोधैर्य मज देई.

राष्ट्रासाठी झुंजत असता
नेत्र अग्निने फुलले असता
बाजी-तानाजीसम लढता
पडे देह रणघाई
गिधाड-कोल्हे भक्ष्य बनाया
लज्जा मजला नाही
परि, मनोधैर्य मज देई.

राष्ट्रासाठी प्राण तेवले
राष्ट्रासाठी जर ते विझले
राष्ट्र-मान-कीर्तिच्या हिशोबी
हिटलरचे आत्मदान लिहिले

जनमत क्षिति मज नाही
या मरणाच्या मिठीत मिटण्या
मनोधैर्य मज देई.

दुबळ्यांसाठी झिजता झिजता
फासामध्ये मान अडकता
अंधेरीतुनि निर्वाणाला
एकटाचि जरि जाई
मरण मला प्रिय, आई,
या मरणाच्या मिठीत मिटण्या
मनोधैर्य मज देई.

राष्ट्राची संपता खंडने
पुनरपि राष्ट्रा सज्ज बांधणे
कुणा न हेवा, कुणा न दावा
सहानुभूती, प्रेम पेरणे
लिंकनचे मग मरण येइ का
दुःख न त्यात मुळीहि
परि, मनोधैर्य मज देई.

औरंगझेबी असेल जिझिया
दायेमाची असेल किमया
त्रस्त प्रजेचे दुःख जगाच्या
वेशीवरती जर टांगाया
सायगावच्या बौद्धांसम की
रस्तोरस्तीं जळणे येई
मज मनोधैर्य ते देई.

मरण असे जर येणार मला
दुःख तयाचे नाही
वीरमरण, परि, कवळाया मज
मनोधैर्य, प्रभु, देई.

मृत्यू जरी सुनिश्चित येवो तोहि झुंझताना
यश सन्मान्य; अयशी कर्तव्यपूर्ती साधना

रक्त तेच पुण्यात्म्याचे ज्याने साधली तपस्या
राष्ट्रासाठी लोकांसाठी ज्याची जीवन-समस्या

करायाची काय कीर्ती राष्ट्र भस्म झाल्यावरी ?
अभिमान कुणा तिचा जीव सारे मेल्यावरी ?

राष्ट्र जगे तेव्हा त्याच्या विश्व कीर्तीची दिक्कत
राष्ट्र-प्राण धोक्यामध्ये हाच कीर्तीसीमा अंत.

स्वार्थाचा न लेश जिथे दिव्य पार पाडण्याला
नीतीधैर्याची बैठक हीच शक्ती मानसाला

घोर कृत्याची प्रचीती सामान्यांना कशी यावी
दिव्य कार्याची थोरवी कुणी, कुठे, कशी गावी ?

खरोखर मूर्ख आम्ही थोरांची नसे कदर
क्षुद्र निर्विवेक पशु जैसे भरावे उदर

## शिवनेरीवर—

### शिवाईसमोर

शिवनेरीच्या माय शिवाई
नतमस्तक हा एक शिपाई
महाराष्ट्राच्या या मातीला
घडेल का गे
स्वातंत्र्याच्या वाऱ्याचा संस्कार ?
कुठली द्रव्ये मिसळुनि
माती पुण्यभस्म होणार ?
दुजा शिवाजी पुन्हा
भवानीखड्ग कधी घेणार ?
तुझ्या कृपेची मंगल पाखर
महाराष्ट्रा मिळणार ?

* * *

शिवनेरीच्या महाप्रस्तरा
उकल अता ते रहस्यमंगल,
' महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचे '
कसे उमलले इथे कमलदल ?
शिवबाचे ते स्वप्न कनकमय

आज भंगले असे कशाने ?
किति शतकांच्या शापानंतर
मिळतील उःशापाची वचने ?
महाराष्ट्राचा स्वतंत्र आत्मा
भारत-हृदयी उज्ज्वल असु दे !
भारतियांच्या स्वतंत्रतेचे
मंगल लेणे इथे जपू दे ! !

* * *

### गंगा-यमुना तडागी

जाग अता शिवनेरी । कूस पुन्हा सुफल करी
आतुरला सह्यगिरी । स्वतंत्रता जगावया ॥ १ ॥
धर्म, कर्म, घर्म, रक्त । अश्रु, श्वास विस्फुरले
पुरुषार्था आळविण्या । हृदय हृदय आसुसले ॥२ ॥
स्वत्व राखुनी जगण्या । दे शिवबा अवतारा
जाग पुन्हा शिवनेरी । राष्ट्रमोचनी मुजरा ॥ ३ ॥

* * *

## शिवरायाचे जन्मस्थान

इथे जन्मले हात जयांनी
शिल्प घडविले महाराष्ट्राचे

इथून डोळे चमकुनि गेले
वैभवस्वप्नी स्वातंत्र्याचे

इथे उसळली लाटांसम ही
सदूर मावळ प्रस्तर शिखरे

उचंबळूनि इथुन वाहिले
महाराष्ट्राचे स्वतंत्र वारे.

इथून रचली गेली उज्ज्वल
पुण्यनगरिची पुण्यशलाका

इथून स्फुरले कधि न विरे जे
स्तोत्र यशाचे 'स्वतंत्र केका'

निनादल्या ज्या तोफा येथुन
अजून भारित मावळ मावळ

अनंत शतके अशीच स्फुरुनी
सुधन्य होइल कीर्तिप्रभावळ

## शिवरायाचे जन्मस्थान

इथे जन्मले हात जयांनी
शिल्प घडविले महाराष्ट्राचे

इथून डोळे चमकुनि गेले
वैभवस्वप्नी स्वातंत्र्याचे

इथे उसळली लाटांसम ही
सदूर मावळ प्रस्तर शिखरे

उचंबळूनि इथुन वाहिले
महाराष्ट्राचे स्वतंत्र वारे.

इथून रचली गेली उज्ज्वल
पुण्यनगरिची पुण्यशलाका

इथून स्फुरले कधि न विरे जे
स्तोत्र यशाचे 'स्वतंत्र केका'

निनादल्या ज्या तोफा येथुन
अजून भारित मावळ मावळ

अनंत शतके अशीच स्फुरुनी
सुधन्य होइल कीर्तिप्रभावळ

शिवनेरीच्या महाप्रस्तरा !
गर्भ तुझा हा अजून मंगल

महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचे
उदक शिळेतुन अजून वाहिल

# निर्धार

माझ्या शरीराची माती
मातीत मिसळून जाण्यापूर्वी
मी माझे समाजवादी स्वयंपूर्ण राष्ट्र उभे करण्यासाठी
जिवाची कुरवंडी करीन.
माझ्या श्रद्धांशी ज्यांच्या श्रद्धा जुळतील
अशा अनेक सरिता निश्चित एकत्र वाहतील
आणि हा लोंढा आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी झटेल
समाजाच्या मोजमापात हा प्रयत्न अल्प ठरला
तरी माझ्या जीवनाच्या मोजमापात
शंभर टक्क्याला काकणभरही कमी पडणार नाही
अशी चळवळ मी उभारीन
कारण समाजाच्या हिशोबात मी अंशभाग असलो तरी
स्वतःपुरता मी पूर्णांश आहे
आणि त्या पूर्णांशाने मी माझ्या श्रद्धांना जागेन.

# अर्घ्य

माझ्या श्रद्धा जर प्रामाणिक असतील
आणि माझ्या श्रद्धांत जर पुण्यच असेल
तर मी उभा ठाकेन, कोसळणार नाही
माझ्या श्रद्धा सफल होतील
जाणि त्या सफल होण्यासाठी मी जगेन वा मरेन
अन् असा मी जगेन तेव्हा
समाज माझ्या जगण्याची चिंता वाहील
नि मी मरेन
तेव्हा त्या मरणातून अनेक उत्थाने स्फुरतील !

## जय महाराष्ट्र

जय हे, जय हे
जय जय महाराष्ट्र वंदन हे
तूच आज पितृभू
तूच एक मातृभू
वैभवी तुझ्या प्रभू
प्राण--आहुतीहि घे,
वंदन हे !

रात्र वाट दाविते तुझी प्रकाश तारका
बंधनी न राहणे निश्चिती मनी न का?
विश्व गर्जु दे
आग वर्षु दे
मृत्यु नाचु दे
मुक्त जीवनांत गात नांदतील मालिका
क्रांतिगीत, राष्ट्रगीत, जीवगीत हे
कोटि कोटि नतमस्तक वंदन घे.

## बोधवाक्य

माझे मन अन् माझी माती
संवादित्वे गीत गाती
त्या गीतातून हृद्गत स्फुरते
तीच कूजिते, तीच गर्जिते.

माथेरान
१८-५-६६

REFBK-0014810
REFBK-0014810

## काहीं उत्स्फूर्त अभिप्राय

" कडाकडा उकळणाऱ्या कढईतील तेल सरळ कानात ओतले जावे असे वाटते. " —एक संपादक

" मुलाना पाठांतराकरता देऊन मुखोद्गत करून घेतली पाहिजेत अशी हृद्गते. " —एक मराठी आई

" निरक्षर बहुजनसमाजाच्या कानी पडण्यासाठीं या कूजिताना अन् गर्जिताना कुणाचा गळा लाभावयास हवा. "

—एक रसिक

" आजच्या काळात ' अत्र्यांच्या मराठ्या ' ने ही छापून घरोघरी पोहोचवली पाहिजेत."—एक ' मराठा 'प्रेमी

" कविता नाहीत कशा ? सुंदर उत्स्फूर्त काव्यच आहे हे ! " —एक कवियित्री

" पुन्हा वाचा ! रस कमी होणार नाही; वाढेल ! ! "

—एक श्रोता

" तुमचे माझे विचार जुळतात. "

—एक अबोल विधायक व्यक्तित्व

" ज्वलंत राष्ट्रवादी विचार; मनाची पकड घेतात. "

—एक समाजशील गृहिणी

" समाजाच्या सगळ्या थरात वाटले जाईल असे राजकीय अधिवेशनातून वितरणासाठी आपण छापून काढू. "

—एक राष्ट्रवादी मुद्रक

अशीं ही ' कूजिते आणि गर्जिते ' मराठी वाचकापर्यंत पोहोचविण्याची संधी मला मिळाली याचा आनंद वाटतो.

—सौ. जयश्री आगाशे

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 98190

# नि र्दे श

कूजिते ही पक्ष्यांची अन् गर्जिते रणवीरांची
अशी एक सर्वसाधारण समजूत !
पण मानवी जीवनाची पूर्णता नि समता
कूजिते नि गर्जिते यांच्या सम्मीलनाशिवाय संभवतच नाही.
शिरीष हे कवि म्हणून त्यानी कूजिते गुणगुणावीत,
निसर्गसहज असे विहगकूजन करावे हे अगदी साहजिक.
तरीपण ते नुसते मृदु मनाचे कविच नाहीत,
तर हाडाचे देशभक्तहि पण आहेत.
आणि म्हणून रणवीराना शोभतील नि स्फूर्ति देतील
अशी गर्जितेहि त्यांनी इथे गाइलेली आहेत.
मात्र यातली कूजिते वेगळी आणि गार्जिते वेगळी
असा 'नीरक्षीरविवेक' करण्याचा प्रयत्न कोणी करू नये,
त्यातून नीर हाती लागणार नाही
नि क्षीरालाहि मुकावे लागेल.
ती दोन्ही एकत्रच वाचली वा ऐकली गेली पाहिजेत;
तरच त्याचा इष्ट तो परिणाम नि हवा तो लाभ होईल.
कूजितानी मनें फुलतील, डवरतील !
अश्रूंच्या गेंदेदार फुलांनी ती समृद्ध होतील.
गर्जितांनी बाहु फुरफुरतील, धमन्या फुगतील, रक्त सळसळेल.
परिणामी जाग्या झालेल्या अस्मितेला निर्धाराची फळे येतील.